# जिल्हा सेतू समिती कार्यालय,नंदुरबार

कुळवहिवाट शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार.

---

**निविदा सूचना (मनुष्यबळ पुरविनेबाबत)**

जिल्हा सेतु समिती, नंदुरबार कडून जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा पुरविण्याकरीता Tally operators,Data entry operators ई. पदांकरिता मनुष्यबळ दर करारावर फेब्रुवारी २०१२ ते जानेवारी २०१३ या एक वर्षाच्या मुदतीकरिता मोहोरबंद निविदा दिनांक ०४/०२/२०१२ दुपारी २.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. त्याबाबत सविस्तर तपशील व अर्ज **कुळवहिवाट शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार** तसेच www.nandurbar.nic.in येथे उपलब्ध आहेत सर्व अटी धारण करणाऱ्या संस्थांना निविदेची कागदपत्रे दिनांक १९/०१/२०१२ ते दिनांक ०३/०२/२०१२ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत रु.५००/- रोख अदा केल्यावर उपलब्ध करुन दिली जातील. सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

--सही --

**जिल्हधिकारी तथा**

**अध्यक्ष,**

**जिल्हा सेतू समिती, नंदुरबार**

जिल्हा सेतू समिती कार्यालय,नंदुरबार
दुरध्वनी क्र.०२५६४-२१०००८, फॅक्स क्र.०२५६४-२१००४१
email-dydeonandurbar@gmail.com

## निविदा सूचना

जिल्हा सेतु समिती, नंदुरबार महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मा.तं.सं नस्ती ०७/३७/३९ दिनांक १० ऑक्टोबर २०११ न्वये तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्याकरीता संस्थाकडून एक वर्षाच्या मुदतीकरिता दोन लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मार्गाविण्यात येत आहेत.

**निविदा मागविण्याचा क्रमांक :- सेतु कक्ष/१०२०/२०१२ दिनांक १८/०१/२०१२**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | कामाचे स्वरुप | :- | एक वर्षाच्या कालावधीकरिता Tally operators, Data entry operators, से.निवृत्त .अ.का./नायब तहसीलदार |
| ब) | अनामत ठेव रक्कम | :- | रुपये १००००/- |
| क) | कंत्राटाचा कालावधी | :- | १ वर्ष |
| ड) | निविदेची किंमत | :- | रुपये ५००/- |

१. निविदाकार संस्थेकडे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२. निविदाकार संस्थेकडे मागील ३ वर्षाची वार्षिक उलाढाल ही ५ लाखापेक्षा कमी असता कामा नये. तसेच निविदाकार संस्थेने मागील ३ वर्षामध्ये रुपये ५ लाखाचे तत्सम पध्दतीचे कंत्राट पूर्ण केलेले असले पाहिजे. निविदाकाराने निविदेसोबत मागील ३ वर्ष सादर केलेले आयकर विवरण व आयकर पॅन नंबर तसेच सर्व्हिस टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. निविदाकाराने वरील सर्व प्रमाणित कागदपत्रे जिल्हा सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांना सादर करणे आवश्यक आहे. निविदा सादर करण्यासाठी आवश्यक अटी व शर्ती शिथिल करण्याचे अधिकार जिल्हा सेतू समिती यांना राहतील. सर्व अटी धारण करणाऱ्यांना निविदाकारांना निविदेची

कागदपत्रे दिनांक १९/०१/२०१२ ते दिनांक ०३/०२/२०१२ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत रु.५००/- रोख अदा केल्यावर कुळ वहिवाट शाखा ,जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे उपलब्ध करुन दिली जातील. सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

४. अनामत ठेव रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकच्या धनाकर्ष सचिव, जिल्हा सेतु समिती नंदुरबार यांचे नावे नंदुरबार येथे देय राहील असा निविदेसोबत अथवा निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांका पूर्वी सादर करण्यात यावी. मात्र सदर रक्कमेवर व्याज देय होणार नाही.

५. निविदाकाराने एकुण दोन लिफाफे त्यावर अनुक्रमांक १ व २असे लिहून या कार्यालयास मोहरबंद सादर करावेत. अ.क्र.१ या लिफाफयात निविदाकाराने निविदा सूचनेत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे ठेवण्यात यावीत व या लिफाफयावर डिमांड ड्राफटचा क्रमांक, दिनांक, अनामत रक्कम आदी बाबी नमूद कराव्यात. तसेच अ.क्र.२ या लिफाफयात फक्त परिशिष्ट -ब (दर तक्ता) ठेवण्यात यावा.

निविदाकाराने लिफाफा क्र. १ मध्ये निविदा सूचनेत नमूद केल्याप्रमाणे, अपेक्षित असलेली सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असल्यासच, समितीकडून लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

या प्रमाणे दोन लिफाफे दिनांक ०४ /०२/२०१२ पर्यंत दुपारी २.०० वाजे पर्यंत निम्नस्वाक्षरीत अधिकाऱ्याकडे सादर करावेत.

6. प्राप्त निविदा जिल्हा सेतू समिती समोर निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील,त्यासाठी निविदाकारांनी अथवा त्यांनी प्राधिकृत प्रतिनिधानां उपस्थित राहावे .

7. इतर आवश्यक त्या बाबी निविदेमध्ये नमूद केल्या आहेत.

8. निविदा स्वीकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार हे अध्यक्ष,जिल्हा सेतू समिती यांचे असतील.

**जिल्हधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा सेतू समिती, नंदुरबार**

परिशिष्ट - 'अ'

अटी व शर्ती :-

निविदा स्विकारणाऱ्या निविदाकारांनी खालील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहुन मनुष्य तास पुरविने आवश्यक आहे.

१. नंदुरबार जिल्ह्यासाठी E-governance व इतर काम करण्यासाठी निविदाकाराने खालील अर्हता धारण केलेल्या मनुष्यबळाची कामासाठी नियुक्ती करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | आवश्यक अर्हता | इतर अर्हता |
|---|---|---|---|
| १. | Tally operators | B.com. ,Tally ,मराठी टायपिंग ३० श.प्र.मि . इंग्रजी टायपिंग ४० श.प्र.मि. | Tally software मध्ये काम करण्याचा १ वर्षाचा अनुभव |
| २. | डाटा एंट्री ऑपरेटर | १२ वी पास, MS CIT अथवा तत्सम मराठी टायपिंग ३० श.प्र.मि. इंग्रजी टायपिंग ४० श.प्र.मि. | MS CIT , संगणकीय ज्ञान |
| ३. | से.निवृत्त .अ.का./नायब तहसीलदार | पदवीधर | महसूल विभागात फाइल हाताळण्याचा पुरेसा अनुभव असावा. |

२. आवश्यक्यतेनुसार तांत्रिक मनुष्यबळाची मागणी करण्यात येईल तसेच याव्यतिरिक्तही तांत्रिक पदांची भविष्यात आवश्यकता भासल्यास ते पुरविणे बंधनकारक राहील .

३. पुरविण्यात येणाऱ्या सेवा हया मनुष्यतास/महिना या सुत्रावर आधारित असाव्यात.

४. निविदाकाराने योग्य ते नोंदणी प्रमाणपत्र, सादर करणे आवश्यक आहे.

५. निविदाकाराने कंत्राटी तत्वावर पुरविण्यात आलेल्या मुनष्यबळाचे हजेरी पत्रक ज्या जिल्हा/तालुक्यातील कार्यालयात कंत्राटी मनुष्यबळास काम करावयाचे आहे त्या कार्यालयात ठेवणे आवश्यक राहील. सदर हजेरीपत्रकानुसार निविदाकाराकडून वेतनाचे invoice दरमहा सादर करण्यात यावे.

६. सदर कामासाठी उपलब्ध झालेल्या मनुष्यबळाकडून कार्यालयीन कामाचे दिवशी 8 तास प्रतिदिन प्रमाणे काम करुन घेतले जाईल. गरज भासल्यास, त्यांना सुट्टीच्या दिवशी कार्यालयात कामासाठी बोलविण्यात येईल (व त्यासाठी अधिक मोबदला देण्यात येणार नाही.) पुरविलेल्या मनुष्यबळापैकी, एखादा कर्मचारी

अनुपस्थित राहिल्यास. सदरचा मोबदला वजा करण्यात येईल. तसेच अनुपस्थित कर्मचाऱ्याच्या ऐवजी दुसरा कर्मचारी तात्काळ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधितांवर राहील व त्याबाबत कोणताही अधिक मोबदला देय होणार नाही.

७. निविदा मंजूर झाल्यानंतर मागणीप्रमाणे सात दिवसांच्या आत पदासाठी आवश्यक पुरेसा अनुभव असलेले मुनष्यबळ उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा प्रत्येक आठवडयाच्या मोबदल्याच्या ५०% एवढी किंवा जास्तीत जास्त कंत्राटाच्या १० टक्के शास्ती लावण्यात येईल.

८. कंत्राटदाराला देण्यात येणाऱ्या मोबदल्या व्यतिरिक्त कोणत्याही मनुष्यबळाची आर्थिक. न्यायिक व इतर कोणत्याही प्रकारची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

९. पुरविण्यात आलेल्या मुनष्यबळाला कामाचा मोबदला व इतर लाभ पुरविण्याची वैधानिक तसेच वजावटी करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील व त्यांनी याबाबत आवश्यक असणारे परवाने. नोंदणी दाखले व शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले नियम यांस बांधील राहतील.

१०.अ) कराराचा एकूण कालावधी एक वर्षाचा आहे. त्यानंतर सदर कंत्राट आपोआप संपुष्टात येईल. त्याच्या समाप्तीबाबतची पूर्व सूचना देण्यात येणार नाही.

ब) पात्र संस्थेचे कालवधी वाढविण्याचे. कमी करण्याचे अथवा मुदतपुर्व संपूष्टात आणण्याचे संपुर्ण अधिकार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष सेतू समिती नंदुरबार यांचेकडे राहतील. वाढीव कंत्राट घेण्याचे व ते पुर्ण करण्याचे बंधन कंत्राटदारावर राहील व त्यास मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष सेतू समिती नंदुरबार यांची मान्यता लागेल.

११. पात्र संस्थेने रक्कम रुपये ५००००/- सुरक्षा ठेव म्हणून नंदुरबार स्थित राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट / बँक गॅरटीच्या स्वरुपात या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१२. निविदा पात्र संस्थेने मुनष्यबळ पुरविल्यानंतर त्यांच्याबाबतचा मोबदला हा मासिक तत्वावर, कंत्राटदाराने दुहेरी प्रतीतील बिल, पुरविलेल्या मनुष्यबळाच्या हजेरीपत्रकासह सादर केल्यानंतर, ६० दिवसांच्या आत देण्यात येईल. तसेच मोबदला देण्यास कोणत्याही कारणास्तव उशीर झाला तर त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही, याचा कृपया नोंद घेण्यात यावी.

१३. पुरविण्यात आलेल्या सेवा हया पूर्णत: कंत्राटी पध्दतीच्या असून, त्यामुळे त्यांचा नियमित नियुक्तीवर कोणताही हक्क असणार नाही.

१४. निविदाकार संस्थेने नियुक्त करण्यात येणाऱ्या विहीत अर्हता धारण करणाऱ्या मनुष्यबळाची यादी त्यांच्या वैयक्तिक माहितीपत्रासोबत या कार्यालयास काम सुरु करण्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

१५. या निविदेच्या अटी व शर्तीच्या अर्थ लावण्याच्या अनुषंगाने कोणताही वाद उद्भवल्यास, सदर प्रकरणी निम्नस्वाक्षरीत अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम राहील.

१६. निविदाकाराने पुरविलेल्या मनुष्यबळास जाण्या-येण्याचा खर्च पुरविण्यात येणार नाही.

१७. वेतन, उपदान, भविष्य निर्वाह निधी, बोनस इ. प्रकारच्या वजावटी तसेच पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाच्या किमान सुरक्षेतेसंबंधीची हमी, विमा, रजा आदी बाबतची सर्व पूर्तता करण्याची जबाबदारी निविदाकार संस्थेची राहील.

१८.अ) पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाचे काम समाधनकारक नाही असे निदर्शनास आल्यास, देण्यात आलेले कंत्राट, कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

ब) पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाचे काम समाधानकारक नाही असे निदर्शनास आल्यास त्याऐवजी इतर उमेदवार तात्काळ उपलब्ध करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

१९. सदर कंत्राटाच्या अनुषंगाने कोणतेही न्यायिक वाद उद्भवल्यास, सदर वाद नंदुरबार स्थित न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येईल.

२०. निविदापात्र संस्थेने मनुष्यबळ पुरविलेले असल्याने, सेवा पुरविणाऱ्याकडून पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाशी जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार चा मालक-नोकर या नात्याने कोणत्याही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रकारचा संबंध असणार नाही

२१. पुरविण्यत आलेल्या मनुष्यबळाला शासनाने निर्धारित केलेले किमान वेतन, उपदान, रजा, बोनस, भविष्य निर्वाह निधी, अपघातामुळे देय कॉम्पेनसेशन व इतर बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहील.

२२. पुरविण्यात आलेले मनुष्यबळ हे केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळी कार्यालयात उपस्थित राहू शकतील व कार्यालयीन वेळेनंतर सदर उमेदवार निम्नस्वाक्षरीत अधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय कार्यालयात उपस्थित राहू शकणार नाहीत.

२३. पुरविण्यात आलेले मनुष्यबळ कामाच्या ठिकाणी सुरक्षा, गोपनीयता, वर्तणुक, वागणुक आदी बाबतच्या नियमाचे पालन करन्याबाबतची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदाराची असेल.

२४. कंत्राटदाराला पुरविण्यात आलेले कंत्राट, या विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय इतर कंत्राटदाराला उप-कंत्राट म्हणुन देता येणार नाही.

२५. कंत्राटदाराने स्थानिक/राज्य/केंद्र सरकार इ. बाबतचे कायदा व नियम याबाबत असणारे नोंदणी दाखला/परवाने नूतनीकरण करुन, योग्य ते अभिलेख जतन करुन अद्यावत ठेवण्यात यावे. कंत्राटदाराने पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाबाबत कोणत्याही प्रकारचे कायद्याने उल्लंघन झाल्यास, त्याबाबतची

संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील व त्याअनुषंगाने झालेली कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई ही कंत्राटदाराला भरावी लागेल.

२६. कामाच्या ठिकाणी सुरक्षा राखणे हे कंत्राटदाराचे काम असेल. कंत्राटदाराकडून पुरविण्यात आलेले मनुष्यबळ हे वैद्यकीय दृष्टया काम करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे.

२७. निविदा पात्र संस्थेने व त्याने पुविलेल्या मनुष्यबळाच्या निष्काळजीपणामुळे कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या तसेच विभागाच्या मालमत्तेला कोणत्याही प्रकारची हानी पोहचल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सदर संस्थेची राहील.

२८. निविदा पात्र संस्थेकडे व्यवसायकर, सर्व्हिस टॅक्स, तसेच अधिकृत नोंदणी दाखले असणे आवश्यक आहे.

२९. आयकर अधिनियमाप्रमाणे कंत्राटदाराची देयकातून आयकराची वजावट करण्यात येईल.

३०. निविदा पात्र संस्थेने जिल्हा सेतु समितीसोबत वर उल्लेख केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करार कंत्राट स्विकारल्यापासून १५ दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे.

३१.. निविदा पात्र संस्थेकडून पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाचा विमा, वर्कमन्स कॉम्पेनसेशन ऍक्ट १९२३ नुसार, उतरविलेला असणे आवश्यक आहे.

३२. वर उल्लेख केलेल्या अटी-शर्तींचे उल्लंघन केल्यास सर्व्हिस प्रोव्हायडरचे कंत्राट १५ दिवसाच्या पुर्व सुचनेने रद्द करण्यात येईल.

३३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी व इतर विभागासाठी शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या दराने मनुष्यबळ पुरविणे निविदा पात्र संस्थेवर बंधनकारक राहील.

३३. वर उल्लेख केलेल्या अटी-शर्ती हया सर्वसमावेश नाहीत, या व्यतिरिक्त कंत्राटामध्ये ठरविलेल्या सर्व अटी व शर्ती या सुध्दा कत्राट करार करतांना स्वीकारार्थ असल्यास, आपल्या करारामधील अटी व शर्ती जरी ठरविलेल्या प्रमाणे असल्या तरी ही जिल्हा सेतू समिती कार्यालयातील अटी व शर्ती (Standard terms of condition of works) सुध्दा पुर्णपणे लागू असतील व सेवा पुरविणाऱ्या संस्था त्यास बांधिल असतील.

## परिशिष्ट-ब (दर तक्ता)

| अ.क्र. | पदाचे नाव | आवश्यक मनुष्यबळ (अंदाजे) | प्रतिमाह/प्रति व्यक्ती दर | सर्व्हीस चार्ज (%) |
|---|---|---|---|---|
| १ | Tally operators | १ | | |
| २ | डाटा एंट्री ऑपरेटर | २२ | | |
| ३ | से.निवृत्त अ.का. / नायब तहसीलदार | १ | | |